नियमित फौ. ख. क्र. ७०/२०२३
सरकार -वि.- राकेश व इतर
नि.क्र. ९.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - किशोर बंडूजी नागोसे,
वय ३६ वर्षे, व्यवसाय – दुकान,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखतो ते आज कोर्टात हजर आहेत. दि.१५.०७.२०२३ रोजी पोलिसांनी मला कोठेही बोलाविले नव्हते मी जात असताना माझी सही घेतली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.१०** देण्यात येते. त्यावेळी माझ्या सोबत हंसराज नव्हता.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५.०७.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स देऊन भिवापूर बस स्टॉप येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तिथे मारहाण झालेल्या ठिकाणाचा पंचनामा तयार केला मला वाचून दाखविला, माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३.		नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
दिनांक १५.०७.२०२५.		स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.